महाराष्ट्र शासन

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय परिसर, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४००००१

Website: https://desk4@dvet.gov.in Email: desk4@dvet.gov.in दुरध्वनी क्र.:०२२-२२६२०६०३/०२९३

क्रमांक - व्यशिप्र-/आस्था-५/ २०२६/नि.बदली २०२६/का-४/३८

दिनांक - ०६/०५/२०२६

प्रति,

१.सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/ पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती

२. सचिव,महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ,मुंबई ८१

विषय - सन २०२६ च्या नियतकालीक बदली वेळापत्रकाबाबत.

संदर्भ - १) महाराष्ट्र राज्य शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिनिबंध अधिनियम-२००५.सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र २१ महाराष्ट्र शासन राजपत्र दि. १२/५/२००६

२) शा नि,सा. प्र विभाग क्र एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन क्र १२, दि.०९/०४/२०१८.

३) कौ.वि व उ विभाग यांचा शा. नि क्र संकिर्ण -१११९/प्र.क्र.२४/१९/व्यशि- ५,दि. २०/०९/२०१९.

४)संचालनालयाचे पत्र क्र व्यशिप्र/आस्था-५/२०२६/नि.बदली/का-४/२२,दि.०७/०४/२०२६.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने तसेच संदर्भ क्र ३ च्या शासन निर्णयान्वये व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय व अधिनस्त कार्यालयातील गट - क व गट - ड सवंर्गातील कर्मचा-यांच्या नियतकालीक / विनंती बदल्या हया ऑनलाईन (Computerised) पध्दतीने राबविण्याच्या कार्यपध्दतीस मान्यता देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने गट - क संवर्गातील कर्मचा-यांच्या सन २०२६ च्या नियतकालीक बदल्या ऑनलाईन पध्दतीने करावयाच्या आहेत.

सदर बाब विचारात घेता नियतकालीक बदल्यांची पुर्व तयारी करणे आवश्यक असल्याने, या विभागातील सन २०२६ च्या नियतकालीक बदल्यांकरीता बदलीपात्र कर्मचा-यांची E-HRMS मधील माहिती अद्ययावत करुन सर्व बदलीपात्र कर्मचा-यांच्या संबंधित संवर्गाचा समावेश होत असल्याची खात्री करण्याच्या सूचना संदर्भ ४ अन्वये देण्यात आलेल्या आहेत .

नियतकालीक बदल्या २०२६ करीता ऑनलाईन प्रणालीमध्ये रिक्त पदे फ्रिज करतांना पुढील बाबीची नोंद घेण्यात यावी.

१) शिल्प निदेशक संवर्गातील राज्यातील रिक्तता पाहता पदे फ्रिज करण्यात येऊ नयेत. तथापी संलग्नता प्राप्त नसलेल्या ,व्यवसाय सुरु नसलेल्या तसेच तिस-या पाळीतील व्यवसाय सुरु नसलेल्या व्यवसाय तुकडयांची पदे फ्रिज करणे अनिवार्य राहिल.

२) वरील संवर्ग वगळता इतर संवर्गातील पदे सामान्य प्रशासन विभाग यांचा शासन निर्णय क्र एसआरव्ही-२०१७ /प्र.क्र ४१५/कार्यासन क्र १२,दिनांक ०९/०४/२०१८ मधील समानिकरण धोरणानुसार फ्रिज करण्यात यावीत.

३) नियतकालीक बदल्या २०२६ (ऑनलाईन प्रणाली) संवर्गनिहाय आणि व्यवसाय निहाय मंजूर भरलेली व रिक्त पदे व फ्रीज पदांची माहिती तात्काळ सादर करण्यात यावी.

४) अवघड क्षेत्रात प्रत्यक्ष कार्यरत कर्मचा-यांचा कालावधीची शहानिशा करुन त्याबाबतची मान्यता देण्याची दक्षता घेण्यात यावी.

त्याअनुषंगाने संचालनालय स्तरावरुन नियतकालीक बदल्या सन २०२६ चा कालबध्द कार्यक्रम व वेळापत्रक सोबत जोडले आहे.तरी वेळापत्रकातील नियतकालीक ऑनलाईन बदल्या २०२६ बाबतची प्रक्रीया विहित मुदतीत पार पाडण्यांत यावी.

(सतिश सुर्यवंशी)
संचालक

प्रत: १) कार्यासन अधिकारी,कार्यासन क्र २ ,मुख्य कार्यालय,मुंबई,यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरीता
२) कार्यासन अधिकारी,कार्यासन क्र १६ ,मुख्य कार्यालय,मुंबई,यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरीता

## सन २०२६ च्या गट-क संवर्गातील ऑनलाईन नियतकालीक कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे वेळापत्रक

| Sr.No | Stages | Date | Time Line |
|---|---|---|---|
| 1 | Updating Post Information | 07/05/2026 To 11/05/2026 | 10.00 AM To 6.00 PM |
| 2 | Updating Employee Profile including Posting History, Present Posting Details, 1st Level Verification in Principal Login. Approval of Profile Verification by respective Office / Institute Head | 07/05/2026 To 11/05/2026 | 10.00 AM To 6.00 PM |
| 3 | Fill Preferences for Transfer in Employee Login 1st Level Verification in Pricipal Login 2nd Level Verification in Joint Director Login | 12/05/2026 To 13/05/2026 | 10.00 AM To 6.00 PM |
| 4 | Generation of Provisional Due List | 14/05/2026 | 2.00 PM Onwards |
| 5 | Retention for Employees and Accept/Reject in Joint Director Login | 15/05/2026 | 10.00 AM TO 5 .00 PM |
| 6 | Generation of Final Due List (upto 30% Limit) | 16/05/2026 | 5.30 PM Onwards |
| 7 | Vacancy List-General Transfer Vacancy List | 17/5/2026 | 11.00 AM |
| 8 | Freeze Vacancy | 18/05/2026 To 18/05/2026 | 10.00 AM TO 5.00 PM |
| 9 | Fill Location preference | 19/05/2026 To 20/05/2026 | 11.00 AM TO 5.00 PM |
| 10 | Transfer list with Location Preferences | 21/05/2026 | 3.00 PM |
| 11 | Generate Transfer Order | 22/05/2026 | 11.00 AM |